मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com
पुणे, पिंपरी-चिंचवड
शनिवार, दि. 13 सप्टेंबर 2025 | पान- 1

# 'स्टच्यू ऑफ हिंदुभूषण'ला ऐतिहासिक गगनभेदी मानवंदना

## 3 हजार ढोल, 1 हजार ताशा अन् 500 हून अधिक भगवा ध्वज; राज्यातील लक्षवेधी सोहळा

**पिंपरी | प्रतिनीधी**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे संपूर्ण जगाला हेवा वाटावा असे भव्य-दिव्य आणि सर्वांत उंच पूर्णाकृती शिल्प अर्थात "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात येत आहे. भगवा ध्वज हा शौर्याचे आणि स्वाभिमानाचे प्रतिक असून, या ध्वजाला आणि भगव्याच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या शंभुराजांच्या कार्याला मानवंदना देण्यासाठी महाराष्ट्रातील सर्वांत मोठा ढोल-ताशा ऐतिहासिक अन् गगनभेदी निनाद सोहळा आयोजित केला आहे.




बोऱ्हाडेवाडी-मोशी येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या जागेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि राज्य सरकारच्या मान्यतेने छत्रपती संभाजी महाराज यांचे पूर्णाकृती शिल्प आणि शंभुसृष्टी उभारण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार तथा हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून हे अतिभव्य स्मारक उभारले जात आहे.

महाराष्ट्रामध्ये ढोल-ताशा या पारंपरिक वादन सोहळ्याला विशेष महत्त्व आहे. 'राज्य उत्सव' म्हणून घोषित केलेल्या गणेशोत्सवात ढोल-ताशा पथकांनी अवघ्या देशाचे लक्ष वेधून घेतले. परंपरा आणि संस्कृती जपणाऱ्या ढोल-ताशा महासंघाच्या वतीने जगातील सर्वांत उंच शिल्प "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" ला मानवंदना देण्याचा संकल्प मांडला होता. त्यानुसार, रविवार, दि. 14 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 3 वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, मोशी येथे ऐतिहासिक मानवंदना सोहळा होणार आहे. तसेच, येत्या दि. 2 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी महाराज पूर्णाकृती शिल्पाच्या तलवारीचे शस्त्रपूजन करण्यात येणार आहे, अशी माहिती हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे उपाध्यक्ष गणेश भुजबळ यांनी दिली.

### शिव-शंभुप्रेमींना आवाहन...

» हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे पराक्रमी पुत्र धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय ऐतिहासिक कार्याला ढोल-ताशांची ही मानवंदना अर्पण केली जाणार आहे. त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या आणि धर्मरक्षणाच्या संघर्षमय कार्याचा जागर या माध्यमातून घडणार आहे. शिव-शंभूंचा विचार संपूर्ण जगभर पोहोचवण्याचा संकल्प हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने केला आहे. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील शिव-शंभूप्रेमींमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. कारण, तब्बल 3 हजार ढोल, 1 हजार ताशा आणि 500 भगवे ध्वज यांसह ऐतिहासिक आणि गगनभेदी मानवंदना होणार आहे. मराठ्यांच्या इतिहासावर आधारित रोमांचक गीतांची झलकही पहायला मिळणार आहे. 'शिवराय आणि शंभूराजांच्या विचारांचे मावळे' म्हणून या ऐतिहासिक सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन ढोल-ताशा महासंघ आणि हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने केले आहे.

# महापालिकेच्या 'महापौर' पदासाठी आरक्षण प्रक्रियेला गती

## एससी प्रवर्गासाठी पद राखीव होण्याची शक्यता? ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध होणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महापौरपदाच्या आरक्षण निश्चितीची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रारूप प्रभागरचनेवरील हरकतींवर दि.१० रोजी सुनावणी पार पडली असून ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध होणार आहे.




महापालिकेवर मागील साडेतीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे. आयुक्तच प्रशासक म्हणून कामकाज पाहत आहेत. दरम्यान, राज्य शासनाने मागविल्यानुसार २००१ पासून २०२२ पर्यंतच्या महापौर आरक्षणाचा तपशील, लोकसंख्या व माजी महापौरांची माहिती महापालिकेने नगरविकास खात्याकडे पाठविली आहे.

शहराची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १७ लाख २७ हजार इतकी आहे. महापौरपदी यापूर्वी प्रकाश रेवाळे, मंगला कदम, डॉ. वैशाली घोडेकर, योगेश बहल, मोहिनी लांडे, शकुंतला धराडे, नितीन काळजे, राहुल जाधव व उषा ढोरे यांनी काम पाहिले आहे. या कालावधीत खुला, ओबीसी व एसटी प्रवर्गांना संधी मिळाली. आता फक्त अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठीचे आरक्षण प्रलंबित आहे. त्यामुळे येत्या निवडणुकीत महापौरपद एससीसाठी राखीव होण्याची शक्यता अधिक आहे.

> 66 राज्य शासनाने महापौर पदाच्या आरक्षण निश्चितीसाठीची माहिती मागविली होती. त्यानुसार, आजपर्यंतच्या महापौरपदाचा आरक्षण सुरू झालेल्याचा आणि संपुष्टात आलेल्याचा कालावधी, लोकसंख्येची माहिती पाठविली आहे.
>
> **- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त- पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# महापालिकेला दिलेले 277.77 हेक्टरचे भूखंड परत द्या!

## ‘पीएमआरडीए’चे आयुक्तांचे शासनाला पत्र; तब्बल 6830 कोटी रुपये बाजारमूल्याच्या जागांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे (पीसीएनटीडीए) जे भूखंड पूर्वी महापालिकेकडे वर्ग करण्यात आले होते, त्यांतील अतिक्रमण झालेले भूखंड महापालिकेकडेच ठेवावेत. मात्र, २७७.७७ हेक्टरचे मोकळे व महत्त्वाचे भूखंड पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) परत द्यावेत, अशा मागणीचा प्रस्ताव ‘पीएमआरडीए’चे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी राज्य शासनाला सादर केला आहे.




यामध्ये महापालिकेकडे वर्ग केलेले २७०.६५ हेक्टर अतिक्रमण बाधित क्षेत्र आणि ७.१२ हेक्टर आरक्षणातील खुल्या जागा सोडून एकूण २७७.७७ हेक्टर मोकळ्या भूखंडांची मागणी करण्यात आली आहे. या भूखंडांची अधिमूल्य किंमत तब्बल ६८३० कोटी रुपये इतकी असल्याने, ‘पीएमआरडीए’च्या हालचालींमागे नेमका कोणाचा डोळा आहे, याची चर्चा शहरात सुरू झाली आहे.

नागरिकांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी १९७२ मध्ये नवनगर प्राधिकरणाची स्थापना झाली. पाच दशकांत १२ हजार घरे आणि सात हजार भूखंड विकल्यानंतर त्याचे कामकाज संपुष्टात आले. जून २०२१ मध्ये शासनाने नवनगर प्राधिकरण बरखास्त करून उर्वरित निधी व मोकळ्या जागा ‘पीएमआरडीए’ला दिल्या. मात्र अतिक्रमण क्षेत्र व राखीव भूखंड महापालिकेकडे वर्ग केले. तथापि, महसूल दप्तरी आजही सर्व भूखंडांवर नवनगर प्राधिकरणाचेच नाव असल्याने मूळ नोंदी त्याच नावाने आहेत.

यामुळेच ‘पीएमआरडीए’ने शासनाला पत्र लिहून मोकळे भूखंड परत मिळवण्याची मागणी केली आहे. या संदर्भात २८ भूखंडांची तपशीलवार यादी आणि त्यांचे बाजारमूल्य शासनाला पाठविण्यात आले आहे.

### महापालिकेशी पत्रव्यवहार नाही

» ‘पीएमआरडीए’ने राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविल्याबाबत महापालिकेला माहिती नाही. त्याबाबत महापालिकेशी कोणताही पत्रव्यवहार झाला नसल्याची माहिती नगररचना आणि भूमी व जिंदगी विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

> “ पीएमआरडीएने मुख्यमंत्र्यांना प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे वर्ग केलेल्या जागांपैकी मोकळे भूखंड आम्हाला परत द्यावेत. त्यातील अतिक्रमण झालेले भूखंड महापालिकेकडेच राहावेत. त्यानुसार २७७.७७ हेक्टर क्षेत्र परत मिळवण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.
>
> – डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.

# झोपडपट्टीवासियांचा सेवाकर भरण्यासाठी मोठा प्रतिसाद

## झोपडपट्टीतील रहिवासीयांकडून 76 लाख 83 हजार सेवा कराची विक्रमी वसुली!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत शहरात महिलांना केंद्रस्थानी ठेवून एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत ‘सारथी सोनचीरैया’ शहर उपजीविका केंद्राशी संलग्न व पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाअंतर्गत कार्यरत असणाऱ्या महिला बचत गटांच्या प्रतिनिधींमार्फत झोपडपट्टीवासियांना सेवाकर बिलांचे वितरण आणि मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलित केली जात आहे. या उपक्रमांतर्गत मार्च २०२५ पासून सेवाकर बिलांचे वितरण सुरू झाले असून तेव्हापासून आतापर्यंत झोपडपट्टीवासियांनी चांगला प्रतिसाद देत जवळपास ७६ लाख ८३ हजार ३९७ रुपयांचा विक्रमी सेवाकर जमा केला आहे.




झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाच्या या उपक्रमाच्या माध्यमातून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली असून त्यांचा आत्मविश्वास वाढण्यासोबतच त्यांच्या कुटुंबांना आर्थिक बळकटी मिळत आहे. आज या महिला सेवाकर बिलांचे वितरण करण्यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मोबाईल ॲपच्या सहाय्याने माहिती देखील संकलित करीत आहेत. या उपक्रमामुळे झोपडपट्टी भागातील महिलांना रोजगार मिळाल्याने त्यांचा समाजातील दर्जा उंचावत असून त्यांच्या योगदानामुळे कुटुंब व समाजाच्या आर्थिक-सामाजिक उन्नतीत भर पडत आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ महसुलवाढीपुरता मर्यादित नसून महिलांच्या सबलीकरणाचे प्रतीक ठरला आहे.

झोपडपट्टीवासियांना यापूर्वी अपुरे पत्ते, चुकीचा मोबाईल क्रमांक अशा समस्यांमुळे सेवा शुल्क बिल वेळेत मिळण्यामध्ये अडचणी निर्माण होत होत्या. मात्र आता या उपक्रमामुळे सेवा शुल्क बिल वेळेत मिळत असून झोपडपट्टीवासी स्वतःहून सेवा शुल्क भरण्यास पुढे येत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना वाढीस लागली आहे आणि महापालिकेच्या महसुलामध्येही वाढ होत आहे. हा उपक्रम सुरू झाल्यापासून म्हणजेच १७ मार्च २०२५ पासून आजपर्यंत सुमारे ७६ लाख ८३ हजार ३९७ रुपयांची वसुली झाली आहे. महसुलातील ही वाढ थेट शहराच्या विकासासाठी हातभार लावणारी ठरत आहे.

### गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत विक्रमी वसुली

» झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाकडे सेवाकराच्या माध्यमातून आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये ३९ लाख ८ हजार २१ रुपये व आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये २९ लाख ७७ हजार ६६८ रुपये महसूल जमा झाला होता. मार्च २०२५ मध्ये महिला बचत गटांच्या प्रतिनिधींमार्फत झोपडपट्टीवासियांना सेवाकर बिलांचे वितरण सुरू झाले. त्यानंतर वेळेत बिल मिळाल्याने १७ मार्च २०२५ ते ३१ मार्च २०२५ याकाळात जवळपास १९ लाख ३ हजार ४२९ रुपयांचा सेवाकर वसूल झाल्याने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सेवाकराच्या माध्यमातून जमा होणाऱ्या महसुलात मोठी वाढ झाली. आकडेवारीनुसार आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये वसूल झालेला सेवाकर ४५ लाख ५४ हजार ७०७ रुपये आहे. तर, १ एप्रिल २०२५ पासून म्हणजेच आर्थिक वर्ष २०२५-२६ सुरू झाल्यापासून आतापर्यंत जवळपास ५७ लाख ७९ हजार ६७० रुपये महसूल जमा झाला आहे. गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत सेवाकर वसुलीची ही आकडेवारी विक्रमी आहे.

# पुण्यात प्रभागरचना सुनावणीत गोंधळ!

## कसबा विधानसभा मतदारसंघातील एका प्रभागाचे तीन तुकडे 'आपला कसबा कुठंय?'

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप प्रभागरचनेवर हरकती, सूचना नोंदविणाऱ्यांमध्ये सत्ताधारी भाजपच्या कार्यकर्त्यांचा समावेश अधिक असल्याचे सुनावणीदरम्यान दिसून आले.

कसबा विधानसभा मतदारसंघातील एका प्रभागाचे तीन तुकडे केल्याने येथील आरक्षण धोक्यात आल्याचा दावा सुनावणीमध्ये काही कार्यकर्त्यांनी केला. दरम्यान पहिल्या दिवशीच्या सुनावणीमध्ये २ हजार ९२० इतक्या हरकती, सूचना सुनावणीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यासाठी सुमारे ५४० हरकतदारांनी उपस्थिती लावली.



महापालिकेने तयार केलेल्या प्रारूप प्रभागरचनांवर घेण्यात आलेल्या हरकतींवर सुनावणी घेतली जात आहे. दोन दिवस ही सुनावणी चालणार आहे. प्रभाग क्रमांक एक ते २९ या प्रभागांमधील हरकतींवर सुनावणी घेण्यात आली. सामान्य प्रशासन विभागाच्या अपर सचिव व्ही. राधा यांनी ही सुनावणी घेतली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, निवडणूक निर्णय अधिकारी प्रसाद काटकर यावेळी उपस्थित होते.

प्रभागरचना करताना भौगोलिक तसेच नैसर्गिक सीमारेषा बदलण्यात आल्या आहेत. काही प्रभागांमध्ये आरक्षण बदलण्यासाठी सोयीस्करपणे लोकसंख्येचे विभाजन केले गेले आहे, असा आरोप सुनावणीमध्ये करण्यात आला. प्रशासनाने गेल्या अनेक वर्षांपासून असलेले आरक्षण बदलावे, यासाठी प्रभाग क्रमांक २४ कमला नेहरू हॉस्पिटल - रास्ता पेठचे तीन तुकडे केल्याचा आरोप करण्यात आला. हरकतींवर सुनावणी होत असताना सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करा, अशा घोषणा दिल्या. या प्रकारामुळे काही काळ सुनावणीच्या ठिकाणी गोंधळाचे वातावरण झाले.

सुनावणीचा पहिला दिवस सुरळीत पार पडल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. उर्वरित प्रभागातील हरकती, सूचनांवर जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार सुनावणी होणार असल्याचे उपायुक्त काटकर यांनी सांगितले.

दरम्यान, पुणे महापालिकेच्या वतीने गुरुवारी घेण्यात आलेल्या प्रभागांच्या सुनावणीसाठी २ हजार ९२० हरकती आल्या होत्या. त्यापैकी प्रत्यक्षात ५४० हरकतधारकांनी सुनावणीसाठी हजेरी लावली. यामध्ये प्रभाग क्रमांक २४ कमला नेहरू हॉस्पिटल-रास्ता पेठचे सर्वाधिक म्हणजे ८५ हरकती नोंदविणारे उपस्थित होते.

### 'आपला कसबा कुठंय?'

» बालगंधर्व रंगमंदिर येथे सुरू असलेल्या प्रभागांच्या हरकतींच्या सुनावणीच्या वेळी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांचे पुत्र प्रणव धंगेकर यांनी 'आपला कसबा कुठंय?' असा फलक सभागृहात झळकावत भावना व्यक्त केल्या. प्रभागरचना करताना राजकीय द्वेष भावनेतून चुकीच्या पद्धतीने आणि नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. कसबा हा पारंपरिक प्रभाग आहे. यापूर्वी झालेल्या निवडणुकांत कसब्याचे अस्तित्व कायम होते. मात्र, या नवीन प्रभागरचनेमध्ये कसब्याचे नावदेखील गायब करण्यात आले आहे. यामागे राजकीय षडयंत्र आहे, अशी भावना अधिकाऱ्यांसमोर प्रणव धंगेकर यांनी व्यक्त केली.

# हिंजवडी आयटी पार्कमधील तीन बड्या बिल्डरांना दणका!

## गेल्या काही दिवसांत चिखलमय रस्त्यांवर दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील चिखलमय रस्ते अपघातांना कारणीभूत ठरत आहेत. यामुळे आयटी पार्क परिसरात सातत्याने अपघात घडून अनेक जणांचा जीवही गेला आहे. या परिसरात अनेक मोठ्या गृहप्रकल्पांची कामे सुरू आहेत. त्याचा राडारोडा रस्त्यांवर पसरत असल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याने शासकीय यंत्रणांनी गोदरेज प्रॉपर्टीज, व्हीटीपी रिॲलिटी आणि गेरा डेव्हलपर्स यांच्यावर कारवाईचे पाऊल उचलले आहे.



आयटी पार्कच्या परिसरात मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्पांची कामे सुरू आहेत. या कामाच्या ठिकाणी बांधकाम साहित्याची वाहतूक करणाऱ्या मालमोटारी सातत्याने रस्त्यांवरून जात असतात. या वाहनांतून पडणारा राडारोडा आणि त्यांच्या चाकांना लागलेला चिखल यामुळे रस्तेही चिखलमय होत आहेत. यामुळे या परिसरात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या महिन्यात सिमेंट मिक्सरने चिरडल्याने एका लहान मुलीचा मृत्यू झाला होता. त्यावेळी तिच्या कुटुंबीयांसह संतप्त नागरिकांनी कारवाईची मागणी केली होती.

गेल्या काही दिवसांत चिखलमय रस्त्यांवर दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. याबाबत स्थानिक नागरिकांसह आयटी कर्मचारी सातत्याने शासकीय यंत्रणांकडे तक्रारी करीत आहेत. अखेर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) गोदरेज प्रार्पटीज आणि गेरा डेव्हलपमेंट्स या विकासकांना नोटिसा बजावल्या आहेत. याचबरोबर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) पत्र लिहून व्हीटीपी रिॲलिटीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळालाही पत्र पाठवून या विकासकांवर कारवाई करण्याची विनंती केली आहे.

दरम्यान, या प्रकरणी गोदरेज प्रॉपर्टीजशी संपर्क साधला असता त्यांचा प्रतिसाद मिळू शकला नाही.

### विकासकांच्या नोटिशीत काय?

बांधकाम साहित्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे रस्त्यांवर राडारोडा पसरतो.

रस्ते चिखलमय आणि निसरडे होऊन वारंवार वाहनांचे अपघात होतात.

वाहनांची चाके धुण्यासाठी प्रकल्पाच्या ठिकाणी सुविधा तयार करा.

रस्त्यावर राडारोडा पसरणार नाही, याची काळजी घ्या.

दररोज सायंकाळी रस्ते स्वच्छ करण्याची जबाबदारी विकासकांनी घ्यावी.

### खासदार सुळे यांनीही वेधले लक्ष

» राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबत म्हटले आहे की, हिंजवडी टप्पा-३ येथील मेगापोलीस सॅफ्रॉन परिसरातील रस्त्यांची चिखलामुळे अतिशय दुरवस्था झाली आहे. याठिकाणी रस्त्याच्या परिस्थितीमुळे आता व यापूर्वीही छोटे-मोठे असे अनेक अपघात घडले आहेत. येथील नागरिकांनी पीएमआरडीए आणि एमआयडीसी यांच्याकडे याबाबत सातत्याने पाठपुरावा केला आहे. परंतु, तरीही हा रस्ता दुरुस्त करण्यात आलेला नाही. या रस्त्यांवरून प्रवास करणे जिकीरीचे झाले आहे. नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी.

# मावळ पर्यटन तालुका घोषित होणार?

## कुरवंडे येथे 330 कोटींचा टायगर पॉईंट पर्यटन प्रकल्प;अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात लोणावळा येथील कुरवंडे गावात प्रस्तावित टायगर पॉईंट प्रकल्पाबाबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या प्रकल्पासाठी ५ फेब्रुवारी २०२४ रोजीच ३३३ कोटी रुपयांची मान्यता मिळाली असून, पर्यटन विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प मावळ तालुक्याचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या प्रकल्पात प्रवेशद्वार, टिकीट घर, फूड कोर्ट, स्नॅक बार, वाहनतळ, कनिष्ठ समारंभ हॉल अशा सुविधा उभारल्या जाणार आहेत. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सायटसीईंग, झिप लाईन, बंजी जंपिंग, वॉल क्लायम्बिंग, फेरीस व्हील अशा साहसी खेळांचा समावेश करण्यात येणार आहे.



त्याचप्रमाणे मनोरंजन व सुरक्षतेच्या दृष्टीने झुला, रेन डान्स, स्केटिंग रिंक, पाण्याची टाकी, सीसीटीव्ही कॅमेरे, ध्वनीप्रणाली, प्रकाशयोजना यांचा प्रकल्पात समावेश असून, उन्हाळ्यातील वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सुरक्षेवर विशेष भर दिला जाणार आहे. स्थानिकांना स्कायवॉकचा अनुभव मिळावा यासाठी दरमहा ध्वजवंदन सोहळा आयोजित करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला. ॲडव्हेंचर व अम्युझमेंट पार्क उभारून मावळ तालुक्यातील पर्यटन सुविधा अधिक बळकट करण्याचा प्रस्ताव बैठकीत मांडण्यात आला.त्याचप्रमाणे प्रकल्प परिसरात टेंटिंग व इतर निवास व्यवस्था उभारून पर्यटकांच्या मुक्कामासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. या प्रकल्पाच्या माध्यमातून मावळ तालुका पर्यटन तालुका म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविण्यात येणार असून, त्यामुळे रोजगारनिर्मिती वाढून ग्रामीण भाग समृद्ध होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यावेळी या बैठकीस उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, आमदार सुनील शेळके, सुभाष शिरोळे, राजेश रासमुथ (नियोजन विभाग), रमेश जाणपुथकर (रामोजी फिल्म सिटी अध्यक्ष), श्री. डुंडे (निवासी अधिकारी – पुणे, VC वर), योगेश म्हसे (आयुक्त – PMRDA, VC वर), मंगेश वानखेडे (GUARDIAN MEDIA), गणेश आप्पा डोरे, दीपक हुलावळे, साहेबराव करके, विठ्ठलराव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर लोणावळा पर्यटनाला नवे रूप मिळेल आणि मावळ तालुका राज्यातील प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून उदयास येईल, अशी माहिती मावळचे आमदार सुनील शेळके यांनी दिली.

# जिल्ह्यात उडीद, मका, सोयाबीन व तुरीचा अधिक पेरा

## कीड व रोगांमुळे विक्रमी धान्योत्पादनाऐवजी किमान सरासरी उत्पादन शक्य

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील खरीप हंगामातील पिकांखालील सरासरी क्षेत्र 2 लाख 2 हजार 263 हेक्टर इतके आहे, तर प्रत्यक्षात 2 लाख 10 हजार 301 हेक्टरवर म्हणजेच सरासरीच्या 104 टक्के क्षेत्रावरील पेरण्या पूर्ण झालेल्या आहेत. सरासरी क्षेत्राच्या तुलनेत सर्वाधिक पेरण्यांमध्ये प्रामुख्याने उडीद 151 टक्के, मका 144 टक्के, तर सोयाबीन आणि तुरीचा पेरा प्रत्येकी 109 टक्क्यांइतका झाल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.

यंदाच्या खरीप हंगामातील पुणे जिल्ह्यातील पीक पेरण्यांचा अहवाल नुकताच अंतिम झाला असून, त्यामध्ये हे चित्र स्पष्ट झाले आहे. पिकांच्या पेरण्यांखालील क्षेत्रवाढीमुळे खरीप उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. मात्र, कीड व रोगांमुळे विक्रमी धान्योत्पादनाऐवजी किमान सरासरी उत्पादन हाती येईल, असेही ते म्हणाले.

चालू वर्षी मे महिन्यापासूनच सुरू झालेल्या पावसामुळे खरिपातील पिकांसाठी पोषक स्थिती हंगामाच्या सुरुवातीसच निर्माण झालेली होती. वास्तविक, उन्हाळी हंगामातील पिकांचे नुकसान लवकर सुरू झालेल्या पावसाने निश्चित झाले.

मात्र, खरिपातील पेरण्यांसाठी हा पाऊस फलदायी राहिलेला आहे. कारण, पावसामुळे जमिनीतील ओलावा, ओढ्या-नाल्यांद्वारे पाण्याची उपलब्धता आणि कमी-जास्त पावसाच्या सरींवर शेतकऱ्यांना बहुतांश पिकांच्या पेरण्या करण्यास मिळालेल्या अवधीमुळे पिकांखालील सरासरी क्षेत्र ओलांडण्यास मदत झाल्याचे



त्यांनी सांगितले.

जादा पावसामुळे अथवा पेरण्यांसाठी जमिनीत पुरेसा वाफसा न मिळाल्याने काही खरीप पिकांच्या पेरण्यांचा कालावधी संपून गेला. त्यामुळे सरासरी क्षेत्राइतक्या काही पिकांच्या पेरण्या होऊ शकल्या नाहीत. जिल्ह्यात खरीप हंगामातील मुगाचे 10 हजार 627 हेक्टर इतके क्षेत्र आहे. तर, सर्वाधिक मुगाची पेरणी ही पूर्व भागातील शिरूर तालुक्यामध्ये 7 हजार 715 हेक्टरवर पूर्ण झाली. तुलनेने अन्य तालुक्यांत मुगाच्या पेरणीखालील क्षेत्र कमी दिसून आले.